# मुकूल माधव फौंडेशनतर्फे सेरेब्रल पाल्सीग्रस्तांना खुर्च्यांचे वितरण

सातारा / प्रतिनिधी

सेरेब्रल पाल्सिग्रस्त मुलांसाठी सेरेब्रल पाल्सी खुर्च्या, व्हीलचेअरमन तसेच कमोड चेअरचे वितरण सातारा येथे मुकुल माधव फाऊंडेशनच्या वतीने शुक्रवार, दि. ४ मार्च वितरण करण्यात आले. मुकुल फौंडेशनच्या वतीने सातारा येथील रुबी हॉल हेल्थकेअर सर्व्हिसेस येथे विशेष सल्लाकेंद्र उघडणार असल्याचे योवळी बोलताना मुकूल माधव फाऊंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू छब्रिया यांनी जाहीर केले.




पाल्सी खुर्च्या वाटपप्रसंगी खा. उदयनराजे भोसले, दमयंतीराजे भोसले, जिल्हाधिकारी अश्विन मुदगल व इतर.

साताराच्या कनिष्क मंगल कार्यालयात आयोजित केलेल्या या कार्यक्रमास रितू छब्रियाच्या शिवाय जिल्हाधिकारी अश्विन मुदगल, मुख्य कार्यकारी अधिकारी नितीन पाटील, पुणे विभागाचे अतिरिक्त आयुक्त शाम देशपांडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दिलीप माने, जिल्हा शिक्षणाधिकारी पुनिता गुरव, कुपर कार्पोरेशनचे फारोख कूपर, सीईओ जाल कूपर, रुबी हॉल क्लिनिकचे डॉ. परवेज ग्रँट, केईएम हॉस्पीटलच्या भारती पाटील उपस्थित होते.

कार्यक्रमास खा. उदयनराजे भोसले, दमयंतीराजे भोसले हेही उपस्थित होते. यावेळी पाच व्हील चेअर्स, सेलेब्रल पाल्सी खुर्ची पाच कमोड व्हिलचेअर्स सह आतापर्यंत मुकुल फौंडेशनने सातारा जिल्ह्यातील सेरेब्रल पाल्सीग्रस्तांना ७४ व्हिलचेअर्स आणि ५२ कमोड खुर्च्या देण्यात आल्या आहेत.